# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३१/०८/२०२५ (रविवार)**

---

## आगामी येणाऱ्या सणोत्सवादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता रामटेक पोलीस स्टेशन येथे काढला रूट मार्च आणि राबविल्या दंगा काबु योजना

आगामी येणाऱ्या गणेशोत्सव आणि ईद—ए—मिलाद या सणोत्सवचा बंदोबस्त असल्याने रामटेक पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीसांनी सणोत्सवादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता दिनांक ३१/०८/२०२५ रोजी रूट मार्च घेवुन दंगाकाबु योजना राबविल्या. तसेच जनतेने सणोउत्सव आनंदाने, निर्भयतेने तसेच शांततेत साजरा करण्याबाबत आव्हान केले.

सदर रुट मार्च पोलीस स्टेशन रामटेक ते शास्त्री चौक ते गांधी चौक ते किसान चौक ते आंबेडकर चौक ते बस स्टँड चौक ते आंबेडकर चौक ते परत पोलीस स्टेशन रामटेक पर्यत ' घेण्यात आला तसेच रूट मार्च दरम्यान पोलीस स्टेशन रामटेक येथील मुख्य चौक गांधी चौक व बस स्टँड चौक रामटेक येथे दंगा नियंत्रण योजनेचा सराव घेण्यात आला आहे. सदर रुट मार्च व दंगा नियंत्रण योजने मध्ये श्री रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक विभाग, रामटेक, पोलीस निरीक्षक श्री रविंद्र मानकर, प्रभारी अधिकारी, रामटेक, सपोनि श्री नारायण तुरकुंडे प्रभारी अधिकारी, देवलापार, यांच्यासह १२ अधिकारी, १ एस आर पी एफ पथक, १ आर सी पी पथक, १२० अंमलदार,६२ होमगार्ड हजर होते.


तारण तरण दि. जैन चैत्यालय रामटेक
2001
शांतता


I-Soft Training Institute & Computers
Become IBM Certified
DATA ANALYST
50%
300+
मातोश्री रमाई बौद्ध विहार


SBI
ATM
फिक्सिट


MAHARASHTRA POLICE
MAHARASHTRA POLICE
MAHARASHTRA POLICE
MAHARASHTRA POLICE
हार्दिक शुभेच्छा
सुमीत कोठारी



## अवैधरीत्या गांजाची लागवड करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद, आरोपी अटक, सावनेर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर** :— दिनांक ३०/०८/२०२५ रोजी सावनेर पोलीसांना गुप्त बातमीदारामार्फतीने खबर मिळाली की, आरोपी नामे सुरेश हरिभाउ नानवट, वार्ड क्र ०३, बुदध विहार जवळ हेटी, ता. सावनेर याने त्याच्या घराच्या बाजुला काही अंतरावर असलेल्या अतिक्रमण केलेल्या जागेत वाडी मध्ये अवैधरित्या गांजा च्या झाडांची लागवड केली आहे . मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा हेटी सुरला येथे नमुद वाडीत जावुन पंचासमक्ष पाहणी केली असता वाडीत ५ नग गांजा सदृश्य वनस्पती मिळुन आल्या .पोलीसांनी ५ नग हिरवे ओले गांजा सदृश्य वनस्पती चे पाने फांदया व मुळासह झाडे वजन २.६६३ किलोग्रॅम किंमती १५,०००/— रूपये असा मुद्देमाल जप्त केला आहे. सुरेश हरिभाउ नानवटकर, वय ५६ वर्ष, वार्ड क्र ०३, बुदध विहार जवळ, हेटी ता सावनेर याचे विरुध्द पोस्टे सावनेर येथे येथे कलम ८(ब),२०(आय),२२(ब) एन डी पी एस ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद आहे. **नमुद आरोपीला पोलीसांनी अटक केली आहे.**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. बुटीबोरी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बुटीबोरी** :— दिनांक ३०/०८/२०२५ रोजी बुटीबोरी पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा खरसोली शिवार, येथे काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता आरोपी नामे १) स्वप्नील एकनाथराव पाटणकर, वय ३२ वर्ष, रा. ह.मु.चक्रपाणी नगर प्लॉट क्र. ०९ गोंडवाणा चौक, हुडकेश्वर, नागपुर २) शुभम मनोहर बागडे, वय ३० वर्ष, रा. अंबीका नगर, प्लॉट क्र. ०९, मोरे स्टयुशन क्लासेस जवळ, नागपुर३) साबीर शेख करीम शेख, वय ३२ वर्ष, रा. अकु मामु यांच्या घरी किरायाणे, यासीन प्लॉट, मोठा ताजबाग, नागपुर ता.जि. नागपुर ४) विनोद रमेश शाहु, वय ४४ वर्ष, रा. न्यु हज हाउस संत्रा मार्केट रोड, लोधी पुरा, नागपुर, ता.जि. नागपुर हे ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना मिळुन आले. **पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ तासपत्ते, रोख रक्कम ४,०३०/— रूपये ,४ मोबाईल आणि तीन मोटर सायकल १) काळया रंगाची प्लसर १८० मो.सा. क्र. एम.एच. ४९ पी. ७६६७ किंमती ४०,०००/— रूपये २) लाल रंगाची मोपेड प्लेझर मो.सा. क्र. एम.एच. ४० ए. डी. ०९२५ किंमती २०,०००/— रूपये ३) सुझुकी कंपनीची पांढ—या रंगाची बर्ग मॅन मोपेड मो.सा.क्र.एम.एच.४९ बी.व्हि. ७२९८ किंमती ५०,०००/— रूपये असा एकुण १,३०,०३०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद आरोपीतांविरूध्द कलम १२(अ) म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद मौदा पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन मौदा :— दिनांक ३०/०८/२०२५ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेतीचे उत्खनन करून विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पटाची दान, मौदा रेती घाटाकडे जात असतांना एक विना नंबरचा लाल रंगाचा स्वराज कंपनीचा ट्रॅक्टर त्याला लाल रंगाची विना

नंबरची ट्रॉली असलेले मिळुन आल्याने. वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक आरोपी नामे  प्रियेश बॅलीस्टर सिंग, वय २३ वर्षे, रा. माथनी, ता. मौदा, याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. तसेच सदर वाहन मालकाबाबत विचारना केली असता वाहन मालक नामे जितु साठवने रा. मौदा ता. मौदा,हा असल्याबाबत माहीती पोलीसांना प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष १) १ ब्रास रेती  आणि २) विना नंबरचा लाल रंगाचा स्वराज कंपनीचा ट्रॅक्टर आणि ट्रॉली असा एकुण ६,०५,५००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.

**ट्रॅक्टर चालक आणि मालक यांच्या विरूध्द  पोस्टे मौदा येथे  कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम , कलम ०३ सार्व. संपत्ती नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक ३०/०८/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक ३१/०८/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. रामटेक उपविभागात पारशिवणी पोस्टे अंतर्गत पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले आणि सदर कोबिंग ऑपरेशन श्री रमेश बरकते यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. हॉटेल लॉजेस चेक करण्यात आले. नाकाबंदी करून संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली तसेच मोटर वाहन अधिनियम अन्वये २४ कारवाई करण्यात आल्या आहेत. सदर कारवाईमध्ये स्थानिक पोलीस स्टेशन चे अधिकारी/अंमलदार यांच्या सोबत दंगा नियंत्रण पथक चे अंमलदार हजर होते.






मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने